# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## बी.बी.ए. (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट) – P145

BACHELOR OF BUSINESS ADMINISTRATION (BUSINESS PROCESS MANAGEMENT)

# माहितीपुस्तिका

## 2023 – 2024

---

*महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित यांच्या सहकार्याने राबविला जाणारा वर्क बेस्ड पदवी शिक्षणक्रम*


**Yashwantrao Chavan Maharashtra Open University (YCMOU)**
Dnyangangotri, Govardhan, Near Gangapur Dam,
Nashik – 422 222

**Maharashtra Knowledge Corporation Limited (MKCL)**
ICC Trade Tower, 'A' Wing, 5th Floor,
Senapati Bapat Road, Shivajinagar, Pune 411 016

Tel: (0253) 2230459, 2230717
Web Site: http://ycmou.digitaluniversity.ac

Tel: (020) 2040114500, 2040114501
Web Site: www.mkcl.org

## विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।
ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १।।
नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।
हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

*कुसुमाग्रज*

**संगणकशास्त्र विद्याशाखा**
माधव पळशीकर, संचालक
श्रीमती रंजिता राठोर, शिक्षणक्रम संयोजक
श्री. संजय मोदियानी, शिक्षणक्रम संयोजक
श्रीमती रामेश्वरी पवार, शिक्षणक्रम संयोजक
श्रीमती देवयानी वारूंगसे, शिक्षणक्रम संयोजक

**विद्यार्थी सेवा विभाग**
डॉ. प्रकाश देशमुख, संचालक
श्रीमती शुभांगी पाटील, सहाय्यक प्राध्यापक

© **2023, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**

**प्रकाशक:** कुलसिचव, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक - 422 222

# अनुक्रमणिका



| **अ.क्र.** | **तपशील** | **पृष्ठ क्रमांक** |
|---|---|---|
| | शैक्षणिक वेळापत्रक | 1 |
| 1. | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ | 2 |
| 2. | संगणकशास्त्र विद्याशाखा | 2 |
| 3. | महाराष्ट्र ज्ञान महामंडळाबरोबर शैक्षणिक सहकार्य | 2 |
| 4. | वर्क-बेस्ड पदवी शिक्षणक्रम – बीबीए (बिझनेस प्रोसेस मॅनेजमेंट) | 3 |
| 5. | शिक्षणक्रम संरचना | 4 |
| 6. | शिक्षणाचे माध्यम | 5 |
| 7. | शिक्षणक्रमाचा कालावधी | 5 |
| 8. | शिक्षणक्रम शुल्क | 5 |
| 9. | प्रवेश पात्रता आणि प्रवेशाच्या वेळी आवश्यक कागदपत्रे | 7 |
| 10. | शैक्षणिक प्रक्रिया | 7 |
| 11. | मूल्यमापन | 8 |
| 12. | प्रवेश प्रक्रिया – प्रवेश कसा घ्याल | 9 |
| 13. | पुनर्नोंदणी | 9 |
| 14. | संपर्कासाठी तपशील | 10 |
| 15. | विभागीय केंद्रे | 10 |
| | परिशिष्ट अ – Academic Bank of Credits-ID तयार करण्याबाबची सूचना | 12 |
| | परिशिष्ट आ – प्रवेश अर्ज नमूना | 13 |
| | परिशिष्ट इ – कराराचा/ हमीपत्राचा मसूदा | 15 |
| | परिशिष्ट ई - विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता<br>1. विद्यापीठास मान्यता<br>2. विद्यापीठाच्या शिक्षणक्रमांना मान्यता<br>3. बीबीए (बिझनेस प्रोसेस मॅनेजमेंट) ला मान्यता | 17 |
| | परिशिष्ट उ – मुक्त विद्यापीठाच्या पदवी आणि पदविकांना समकक्षता आणि मान्यता देणारा महाराष्ट्र शासनाचा निर्णय | 19 |

# शैक्षणिक वेळापत्रक

| अ.क्र. | तपशील | मासिक वेळापत्रक | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | विषम सत्र | | सम सत्र | |
| | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत |
| 1 | द्वितिय व तृतिय वर्ष ऑनलाईन प्रवेश | 06/07/2023 | 31/07/2023 | -- | -- |
| 2 | प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश आणि हमीपत्र MKCL कडे जमा करणे | 06/07/2023 | 31/07/2023 | -- | -- |
| 3 | गृहपाठ जमा करणे | नोव्हेंबर | नोव्हेंबर | एप्रिल | एप्रिल |
| 4 | गृहपाठ तपासणे | डिसेंबर | डिसेंबर | मे | मे |
| 5 | प्रात्यक्षिक आणि प्रकल्प परीक्षा | जानेवारी | जानेवारी | जून | जून |
| 6 | लेखी परीक्षा | जानेवारी | जानेवारी | जून | जून |
| 7 | निकाल जाहीर | फेब्रुवारी | फेब्रुवारी | जुलै | जुलै |
| 8 | पुनर्नोंदणी | जून | जून | --- | --- |
| 9 | स्वयं अध्ययन साहित्याचे वितरण | जुलै | जुलै | जुलै | जुलै |
| 10 | संपर्क सत्रे | सप्टेंबर | डिसेंबर | फेब्रुवारी | मे |

**सूचना -** वेळापत्रकात बदल होऊ शकतात. अद्ययावत वेळापत्रकासाठी तसेच नोंदणी, परीक्षा आणि शिक्षणक्रमासंबंधीत इतर उपयुक्त माहितीसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (ycmou.digitaluniversity.ac ) आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या संकेतस्थळावर (ybba.mkcl.org) नियमितपणे भेट द्यावी.

## 1. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची** स्थापना महाराष्ट्र राज्य कायदेमंडळाच्या जुलै 1989 कायदा क्र. 20-(1989)च्या अंतर्गत करण्यात आली आहे. सरकारी आणि निमसरकारी आस्थापनांमधील नोकरीच्या उद्देशासाठी या विद्यापीठाची पदवी आणि पदविका यांना अन्य कोणत्याही विद्यापीठाची पदवी आणि पदविका यांच्याच दर्जाचे मानले जाते. ज्ञानाची निर्मिती करणे, त्याचे जतन करणे याबरोबरीनेच समाजातील तळागाळापर्यंत ज्ञानगंगा नेत लोक विद्यापीठ विद्यार्थी आणि सर्वसामान्य जनता यांच्यामध्ये त्याचा प्रसार करून लोक विद्यापीठ (Mass-Varsity)' बनणे हे विद्यापीठाचे ध्येय आहे.

संपूर्ण महाराष्ट्र कार्यक्षेत्र असणाऱ्या या विद्यापीठाचे मुख्यालय नाशिक येथे असून ज्ञानगंगा घरोघरी नेणे सुलभ व्हावेम्हणून महाराष्ट्रात विद्यापीठाची आठ विभागीय केंद्रे कार्यरत आहेत. विभागीय केंद्रांतर्गत असणाऱ्या विविध शिक्षणक्रमासाठीच्या मान्यताप्राप्त अभ्यासकेंद्रांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना विविध शिक्षणक्रम उपलब्ध करून दिले जातात.

## 2. संगणकशास्त्र विद्याशाखा

विद्यापीठातील आठ विद्याशाखांपैकी संगणकशास्त्र विद्याशाखा ही एक असून तिच्या गुणवत्ता धोरणानुसार शैक्षणिक कार्यक्रमांच्या गुणवत्ता वाढविण्याचा आणि ती टिकवून ठेवण्याचा सतत प्रयत्न केला जातो. संगणक शिक्षण लोकांपर्यंत नेऊन संगणक साक्षरता निर्माण करण्याचे ध्येय ठेवून विद्याशाखेचे काम सुरू झाले.

संगणक विद्याशाखेची वाटचाल पुढील दृष्टीने सुरू आहे.

- माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ मनुष्यबळाची गरज भागवणारे पदवी, पदव्युत्तर आणि संशोधन स्तरावरील शिक्षणक्रम विकसित करणे
- समाजाच्या गरजा लक्षात घेऊन नोकरी-व्यवसायासाठी उपयुक्त ठरतील असे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कौशल्ये प्राप्त केलेले मनुष्यबळ तयार करणारे कमी कालावधीचे शिक्षणक्रम विकसित करणे.
- शिक्षणक्रम कालबाह्य होऊ नयेत यासाठी पाठ्यक्रमात कालानुरूप बदल करणे.
- विद्यार्थ्यांना महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या लर्न लाइव्ह प्रणालीचा वापर करून ईलर्निंग सुविधा उपलब्ध करून देणे.
- उद्योग आणि इतर शैक्षणिक संस्थांशी संवाद साधत अनुभव आणि ज्ञानाच्या देवाणघेवाणीला चालना देणे.
- संगणक आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील शिक्षण देण्यासाठी उपयुक्त अशी तंत्रे, साधने, पद्धती विकसित करण्यासाठी संशोधन करणे आणि त्याचा आवलंब करत शिक्षणक्रम प्रवर्तनाची गुणवत्ता वाढविणे.

प्रत्यक्ष कामातून ज्ञान, आणि ज्ञानातून अधिक फलदायी काम या 'नई तालीम' तत्वावर आधारित वर्क बेस्ड पदवी शिक्षणक्रम राबविण्याचा अभिनव प्रयोग करण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळ लिमिटेड यांनी सहकार्य करार केला असून त्याअंतर्गत बीबीए (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट) आणि बी.एस्सी. (कॉम्प्यूटर सिस्टिम्स अडमिनिस्ट्रेशन) हे शिक्षणक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले आहेत.

## 3. महाराष्ट्र ज्ञान महामंडळाबरोबर शैक्षणिक सहकार्य

**महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसीएल)** ही महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने 2001 साली पुरस्कृत केलेली एक पब्लिक लिमिटेड कंपनी आहे. अध्यापन, अध्ययन, शैक्षणिक व्यवस्थापन प्रक्रिया व एकंदरीत

सामाजिक-आर्थिक परिवर्तनशील प्रक्रिया यांमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा अंतर्भाव आणि याचे सार्वत्रिकीकरण याद्वारे शिक्षण व विकास यांचे एक नवीन प्रारूप निर्माण करणे हे एमकेसीएलचे उद्दिष्ट आहे.

**एमकेसीएल फिनिशिंग स्कूल्स** अंतर्गत प्रत्यक्ष कार्यानुभावर आधारित पदवी आणि पदविका शिक्षणक्रम राबविले जातात. प्रत्यक्ष कामातून ज्ञान, आणि ज्ञानातून अधिक फलदायी काम या 'नई तालीम' तत्वावर आधारित हे शिक्षणक्रम आहेत. प्रत्यक्ष कामातून कौशल्य आत्मसात करणे, ई-लर्निंग व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली थिअरीचा पाया पक्का करणे अशी या शिक्षणक्रमांची रचना आहे. 'Learning through working' अशी ही अभिनव शिक्षण पद्धती आहे. हे शिक्षणक्रम राबविण्यासाठी एमकेसीएलच्या सहयोगी इंडस्ट्रीज / संस्थांतर्फे विद्यार्थ्यांना वर्क लॅब उपलब्ध होते व त्यांना प्रत्यक्ष कार्यानुभवाची संधी मिळते. या व्यतिरिक्त आपल्या गावातील / पंचक्रोशीतील स्थानिक संसाधनांवर आधारित, विविध सेवा क्षेत्र / व्यवसाय / उद्योग / संस्था इत्यादी मार्फत प्रत्यक्ष काम करून उपजीविका मिळवणाऱ्या युवक-युवतींना बीबीए (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट) या शिक्षणक्रमाला प्रवेश घेता येतो.

## 4. वर्क-बेस्ड पदवी शिक्षणक्रम - बीबीए (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट)

बी.बी.ए. (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट) हा शिक्षणक्रम करताना विद्यार्थी प्रत्यक्ष काम करत असणे अपेक्षित आहे. शिक्षणक्रमातील विविध अभ्यासक्रम शिकत असताना त्यात शिकलेल्या गोष्टी, मिळवलेले ज्ञान, कौशल्ये यांची आपल्या कामाशी सांगड घालत, त्याचा वापर कामामध्ये करून कामाची गुणवत्ता, परिणामकारकता वाढविण्यासाठी, उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यास विद्यार्थ्याला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे. त्यासाठी या शिक्षणक्रमाममध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचे प्रत्यक्ष कामातील सुधारणांसाठी वैयक्तिक मार्गदर्शन मिळणार आहे आणि त्याच्या प्रयत्नांचे मूल्यमापन होणार आहे. घेत असलेल्या शिक्षणाची कामाशी सांगड घालण्याच्या मिळालेल्या संधीमुळे करत असलेले काम तसेच घेत असलेले शिक्षण या दोन्हीची गुणवत्ता वाढणे अपेक्षित आहे. उच्च शिक्षणातील हा एक महत्वाचा प्रयोग आहे. अर्थात हे वेगळेपण विदयार्थ्याला पटलेले असणे, या प्रयोगात मनापासून सहभागी होत स्वत: त्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे अभ्यासक्रमांची सांगड विद्यार्थी प्रत्यक्ष करत असलेल्या कामाशी घालत त्यातून शिक्षणात तसेच कामात होत असलेल्या प्रगतीची (कामातून ज्ञानप्राप्ती आणि ज्ञानातून अधिक फलदायी काम) प्रचिती विद्यार्थायाला मिळवून देण्यात मार्गदर्शकाची भूमिका महत्त्वाची आहे.

कोविडोत्तर काळात, नोकरी, रोजगार तसेच उपजीविकेची साधने बदलत आहेत. मोठ्या शहरांत राहून नोकरी, रोजगार, उपजीविका मिळवणं आव्हानात्मक होत आहे. जागतिक महामारीमुळे आपापल्या गावी परतलेल्या अनेक युवक-युवतींच्या उच्चशिक्षणाचा प्रश्न गंभीर होत आहे. या पार्श्वभूमीवर केवळ वर्कलॅब उपलब्ध होऊ शकणाऱ्या विदयार्थ्यांपुरताच हा शिक्षणक्रम मर्यादित न ठेवता आपल्या गावातील / पंचक्रोशीतील स्थानिक संसाधनांवर आधारित, विविध सेवा क्षे / व्यवसाय / उद्योग इत्यादी मार्फत प्रत्यक्ष काम करून उपजीविका मिळवणाऱ्या किंवा स्वयं-व्यवसाय करणाऱ्या युवक-युवतींना देखील हा शिक्षणक्रम करण्याची संधी दिली जात आहे. प्रवेश घेऊ शकणारे सांभाव्य विद्यार्थी लक्षात घेऊन मराठीतून हा शिक्षणक्रम उपलब्ध करून देण्यात आला आहे.

या शिक्षणक्रमामुळे स्वयं-व्यवसाय करणाऱ्यांना तसेच उपजीविकेसाठी काम करावे लागणाऱ्यांना आपला व्यवसाय, उपजिविकेतील सहभाग काही वर्षांसाठी सोडून मोठ्या शहरांत स्थलांतरित न होता एक व्यावसायिक पदवीधर होण्याची संधी मिळणार आहे. या प्रक्रियेत ते सध्या करत असलेल्या कामामध्ये उत्पादकता वाढवण्यात, आनंद मिळवण्यात ते यशस्वी झाले, त्याची प्रचिती त्यांना आली तर शहराकडे होणारे स्थलांतर कमी होण्यासही हातभार लागणार आहे.

## शिक्षणक्रम संरचना

[1 श्रेयांक म्हणजे 35-40 तासांचा अभ्यास. यात स्वयं अध्ययन, मार्गदर्शन सत्र, प्रात्यक्षिकं, स्वाध्याय याचा समावेश आहे]

**प्रथम वर्ष, सत्र पहिले (18 श्रेयांक)**

| अभ्यासक्रम संकेतांक | अभ्यासक्रमाचे नाव | श्रेयांक |
|---|---|---|
| BBA121 | व्यवस्थापनाची मूलतत्त्वे (Fundamentals of Management) | 4 |
| BBA122 | विपणनाची मूलतत्वे (Basics of Marketing) | 4 |
| BBA123 | लेखी संवाद कौशल्ये (Written Communication Skills) | 4 |
| BBA124 | मूलभूत माहिती तंत्रज्ञान कौशल्ये – (Basic IT Skills ) | 4 |
| BBA125 | लघु प्रकल्प-1 – सत्र अहवाल (Mini Project 1) | 2 |

**प्रथम वर्ष, सत्र दुसरे (18 श्रेयांक)**

| अभ्यासक्रम संकेतांक | अभ्यासक्रमाचे नाव | श्रेयांक |
|---|---|---|
| BBA221 | सेवा विपणनाची मूलतत्त्वे (Foundations of Service Marketing) | 4 |
| BBA222 | ग्राहककेंद्री व्यवस्थापन (Focus on the Customer) | 4 |
| BBA223 | ग्राहकांच्या गरजा (Understanding Customer Requirements) | 4 |
| BBA224 | संवाद आणि मृदू कौशल्ये (Communication and Soft Skills ) | 4 |
| BBA225 | लघु प्रकल्प-2 – सत्र अहवाल (Mini Project 2) | 2 |

**द्वितिय वर्ष, सत्र तिसरे (18 श्रेयांक)**

| अभ्यासक्रम संकेतांक | अभ्यासक्रमाचे नाव | श्रेयांक |
|---|---|---|
| BBA321 | सेवा क्षेत्राच्या संदर्भात मानवी वर्तनाचे आकलन (Understanding Human Behaviour) | 4 |
| BBA322 | मूलभूत संख्याशास्त्र (Basic Quantitative Techniques) | 4 |
| BBA323 | पर्यावरण अभ्यास (Environmental Studies) | 4 |
| BBA324 | प्रगत माहिती तंत्रज्ञान कौशल्ये – (Advanced IT Skills) | 4 |
| BBA325 | लघु प्रकल्प-3 – सत्र अहवाल (Mini Project 3) | 2 |

**द्वितिय वर्ष, सत्र चौथे (18 श्रेयांक)**

| अभ्यासक्रम संकेतांक | अभ्यासक्रमाचे नाव | श्रेयांक |
|---|---|---|
| BBA421 | सेवा-व्यवहारांचा परिचय (Introduction to Service Operations) | 4 |
| BBA422 | सेवा संरचना (Service Design) | 4 |
| BBA423 | सेवा गुणवत्ता आणि सुधारणा (Service Quality and Improvement) | 4 |
| BBA424 | हिशोबशास्त्र – माहिती प्रणाली (Accounting as Information System) | 4 |
| BBA425 | लघु प्रकल्प-4 – सत्र अहवाल (Mini Project 4) | 2 |

**तृतिय वर्ष, सत्र पाचवे (18 श्रेयांक)**

| अभ्यासक्रम संकेतांक | अभ्यासक्रमाचे नाव | श्रेयांक |
|---|---|---|
| BBA521 | अर्थव्यवस्था आणि सेवा (Economy and Services) | 4 |
| BBA522 | सेवा वितरण (Delivering and Performing Service) | 4 |
| BBA523 | सेवाक्षेत्रातील व्यवहारांचे व्यवस्थापन – 1 (Managing Service Operations - I) | 4 |
| BBA524 | माहिती प्रक्रिया आणि अहवाल (Data Processing and Reporting) | 4 |
| BBA525 | लघु प्रकल्प-5 (Mini Project 5) | 2 |

**तृतिय वर्ष, सत्र सहावे (18 श्रेयांक)**

| अभ्यासक्रम संकेतांक | अभ्यासक्रमाचे नाव | श्रेयांक |
|---|---|---|
| BBA621 | विश्वसनीय सेवा व्यवस्थापन (Managing Service Promises) | 4 |
| BBA622 | सेवाक्षेत्रातील व्यवहारांचे व्यवस्थापन – 2 (Managing Service Operations - II) | 4 |
| BBA623 | सेवा उद्योजकता (Service Entrepreneurship) | 4 |
| BBA624 | संशोधन प्रक्रिया (Research Process) | 4 |
| BBA625 | लघु प्रकल्प-6 (Mini Project 6) | 2 |

## 5. शिक्षणक्रमाचे माध्यम

शिक्षणक्रमाचे माध्यम मराठी असेल. अध्ययन साहित्य मराठीतून असेल. परीक्षा मराठी माध्यमातून होतील. केंद्र संयोजक, मार्गदर्शक मराठीबरोबरच गरजेप्रमाणे हिंदी, इंग्रजीचा वापर करू शकतात. वर्क लॅबमधील संवादाचे माध्यम तिथल्या गरजेप्रमाणे इंग्रजी, हिंदी, मारठी किंवा इतर भाषाही असू शकते.

## 6. शिक्षणक्रमाचा कालावधी

बी.बी.ए. (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट) हा शिक्षणक्रम तीन वर्ष कालावधीचा आहे. बी.बी.ए. (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट) या शिक्षणक्रमासाठी सत्र पद्धतीचा स्वीकार विद्यापीठाने केला आहे. प्रत्येक शैक्षणिक वर्ष दोन सत्रात विभागलेले आहे. नोंदणी केल्यापासून जास्तीत जास्त पाच वर्षात हा शिक्षणक्रम विद्यार्थ्याला पूर्ण करावा लागेल. या कालावधीत शिक्षणक्रम पूर्ण न केल्यास विद्यार्थ्याला पुन्हा नव्याने प्रवेश घ्यावा लागेल (सदर शिक्षणक्रम त्यावेळी सुरू असेल तरच ही सुविधा उपलब्ध असेल).

## 7. शिक्षणक्रम शुल्क

शिक्षणक्रम शुल्काचे चार भाग आहेत:

- **अनिवार्य शुल्क:** अनिवार्य शुल्कामध्ये माहितीपुस्तिका, पात्रता तपासणी, नोंदणी, ओळखपत्र, ई-सुविधा / ई-सर्व्हिसेस, संवाद, खेळ, विद्यार्थी कल्याण विभाग, राज्यपाल कार्यालय उपक्रम, आपत्ती व्यवस्थापन, ग्रंथालय, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विमा, पदवी प्रमाणपत्र, माजी विद्यार्थी संघ या शुल्काचा समावेश आहे.

- **अभ्यासकेंद्र हिस्सा:** शिक्षणक्रम प्रवर्तनासंदर्भात ज्या विविध गोष्टी अभ्यासकेंद्रांवर होतात त्यावरील खर्चाचा यात समावेश आहे.
- **विद्यापीठ हिस्सा:** शिक्षणक्रमासंदर्भात विद्यापीठातून ज्या विविध शैक्षणिक गोष्टी केल्या जातात त्यावरील खर्चाचा यामध्ये समावेश आहे.
- **परीक्षा शुल्क:** प्रथम वेळेस परीक्षेस बसण्यासाठीच्या शुल्काचा यात समावेश आहे.

| Sr. No. | शिक्षणक्रम | वर्ष | अनिवार्य शुल्क | विद्यापीठ शुल्क | अभ्यासकेंद्र शुल्क | परीक्षा शुल्क | शिक्षणक्रम शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बीबीए (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट[P145] | प्रथम वर्ष | 608 | 15452 | 0 | 2040 | **18100** |
| | | द्वितिय वर्ष | 498 | 15562 | 0 | 2040 | **18100** |
| | | तृतिय वर्ष | 858 | 15202 | 0 | 2040 | **18100** |

**सूचना:** प्रत्येक वर्षी शुल्कात 10% वाढ होईल.

- विद्यार्थ्याला ऑनलाईन प्रवेश घेताना पूर्ण शिक्षणक्रम शुल्क एकरकमी व ऑनलाईन भरावे लागेल शिक्षणक्रम शुल्क हप्त्यांमध्ये भरण्याची सोय नाही.
- एकदा भरलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही व हस्तांतरित करता येणार नाही.

**अनिवार्य शुल्क तपशील**

| अ.क्र. | शुल्क तपशील | प्रथम वर्ष | द्वितिय वर्ष | तृतिय वर्ष |
|---|---|---|---|---|
| 1 | नोंदणी | 200 | 200 | 200 |
| 2 | पात्रता तपासणी | 100 | 0 | 0 |
| 3 | ओळखपत्र | 10 | 0 | 0 |
| 4 | माहितीपुस्तिका | 50 | 50 | 50 |
| 5 | ईसुविधा / ई सर्व्हिसेस | 60 | 60 | 60 |
| 6 | ग्रंथालय | 10 | 10 | 10 |
| 7 | कुलपती कार्यालयाचे उपक्रम | 38 | 38 | 38 |
| 8 | खेळ | 50 | 50 | 50 |
| 9 | विद्यार्थी कल्याण विभाग | 50 | 50 | 50 |
| 10 | आपत्ती व्यवस्थापन | 10 | 10 | 10 |
| 11 | राष्ट्रीय सेवा योजना | 10 | 10 | 10 |
| 12 | माजी विद्यार्थी संघ | 0 | 0 | 10 |
| 13 | संवाद | 10 | 10 | 10 |
| 14 | पदवी प्रमाणपत्र | 0 | 0 | 350 |
| 15 | विद्यार्थी विमा | 10 | 10 | 10 |
| | एकूण | 608 | 498 | 858 |

## 8. प्रवेश पात्रता आणि प्रवेशाच्या वेळी आवश्यक कागदपत्रे

12 वी उत्तीर्ण किंवा 10 वी नंतर 3 वर्षांचा शासनमान्य पदविका (डिप्लोमा) उत्तीर्ण

- आधीपासून नोकरीत (in-service) असणे श्रेयस्कर

**किंवा**

- स्थानिक संसाधनांवर आधारित विविध सेवा क्षेत्र / व्यवसाय / उद्योग / स्वयं रोजगार / स्वयं व्यवसाय / संस्था इत्यादी मार्फत उपजीविका श्रेयस्कर

प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडे पुढील कागदपत्रे लागतील

- आधार कार्ड
- वयाचा दाखला (जन्म दाखला/ वाहन चालवण्याचा परवाना / पॅन कार्ड/ आधार कार्ड /शाळा सोडल्याचा दाखला)
- बारावीचे गुणपत्रक/ दहावीचे गुणपत्रक आणि शासनमान्य तीन वर्षाच्या पदवीकेचे गुणपत्रक
- अर्जासोबत विविध सेवा क्षेत्र / व्यवसाय / उद्योग / स्वयं रोजगार / संस्था इत्यादी मार्फत पदवी शिक्षणक्रमाच्या तीन वर्षांमध्ये सातत्याने उपजीविका करणार असल्याचे तपशीलासह **प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट इ)**

## 9. शैक्षणिक प्रक्रिया

बी.बी.ए. (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट) हा शिक्षणक्रम महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या सहकार्याने राबविण्यात येत असून या शिक्षणक्रमासाठी YCMOU MCA STUDY CENTRE (54491) हे एकमेव अभ्यासकेंद्र असून अभ्यासकेंद्राला प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची नोंदणी या अभ्यासकेंद्रावरच होईल. वर्क बेस्ड शिक्षणक्रम असल्याने शिक्षणक्रम कालावधीत विद्यार्थी काम करत असणे अपेक्षित आहे. त्यामुळे शिक्षणक्रम शिकत असताना प्राप्त केलेले ज्ञान व कौशल्ये आपण करत असलेल्या कामात वापरून पाहणे त्याला शक्य होईल.

पारंपारिक पदवी शिक्षणक्रमात फक्त अभ्यासक्रमांचा अभ्यास करून ज्ञान प्राप्त करणे, कौशल्ये प्राप्त करणे व मूल्यमापनासाठी होणाऱ्या परीक्षांमध्ये विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरांमधून आपण किती ज्ञान प्राप्त केले आहे, कौशल्ये प्राप्त केली आहेत ते सिद्ध करणे अपेक्षित असते. बी.बी.ए. (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट) या वर्क बेस्ड शिक्षणक्रमामध्ये हे तर विद्यार्थ्यांना करायचे आहेच पण त्याचबरोबरीने आपल्या दैनंदिन कामामध्ये प्राप्त केलेले ज्ञान व कौशल्ये वापरण्याचा प्रयत्न करत कामाची गुणवत्ता, परिणामकारकता वाढविण्याचा प्रयत्नही करायचा आहे. प्राप्त केलेल्या ज्ञानाची आणि कौशल्यांची सांगड विद्यार्थी करत असलेल्या कामांशी घालण्यात मदत करण्यासाठी मार्गदर्शक असणार आहेत. विद्यार्थ्यांच्या कामाशी निगडित क्षेत्रातले तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून काम करणार आहेत. हे मार्गदर्शक बी.बी.ए. (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट) शिक्षणक्रमाला प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याशी नियमित चर्चा करून वैयक्तिक मार्गदर्शन करणार आहेत, सल्ला देणार आहेत. विद्यार्थ्याला प्रत्येक सत्रात विविध अभ्यासक्रमात प्राप्त केलेले ज्ञान आणि कौशल्ये यांची त्याच्या कामात कशी सांगड घातली, त्यातून कामाची गुणवत्ता, परिणामकारकता वाढविण्यास कशी मदत झाली, ही सांगड घालत असताना काय अडचणी आल्या, मार्गदर्शकांचा यात कसा सहभाग होता याचा अहवाल तयार करायचा आहे. प्रत्येक सत्रात यासाठी ज्ञान व कौशल्याचे कामात उपयोजन (Application of Knowledge and Skills in Work) या दोन श्रेयांकाच्या अभ्यासक्रमाची तरतूद करण्यात आली असून विद्यार्थ्यांना त्यासाठी श्रेणी देण्यात येणार आहे

प्रत्येक सत्रामध्ये लघु प्रकल्प (मिनी प्रोजेक्ट) या स्वरूपात हा सत्र अहवाल विद्यार्थ्यांनी पूर्ण करायचा आहे. या लघु प्रकल्पामध्ये त्या सत्रात केलेल्या कामाचा तपशीलवार अहवाल, प्रेझेंटेशन आणि व्हीडीओ स्वरूपात सादर करायचा आहे.

विद्यार्थ्याने प्रत्यक्ष कामातून संपादन केलेले ज्ञान व विविध कौशल्यांचे उपयोजन, तसेच व्यवसाय कौशल्ये, सादरीकरण कौशल्ये आणि प्रकल्प लिखाण कौशल्ये तपासली जातील. हा प्रकल्प करताना, विद्यार्थ्याला त्याच्या कामाचे पुरावे देणे शक्य होईल. प्रकल्प करण्याची मार्गदर्शक तत्वे विद्यार्थ्यांना ERA लॉगीन मध्ये उपलब्ध केली जातील.

इतर अभ्यासक्रमांसाठी लर्न लाईव्ह या महाराष्ट्र ज्ञान महामंडळाने विकसित केलेल्या ऑनलाईन प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. यासाठी शिक्षणक्रमातील प्रत्येक अभ्यासक्रमासाठी ई- लर्निंग साहित्य विकसित करण्यात आले आहे. यात नियमित ऑनलाईन वर्ग घेण्यात येणार असून त्याशिवाय विद्यार्थ्याला संकल्पना, उदाहरणे, प्रत्यक्ष जीवनातील केस स्टडीज यांचा अभ्यास करण्यासाठी दृक-श्राव्य स्वरूपातील ई-लर्निंग साहित्य आणि सराव प्रश्न मिळतील. याच प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांना वेळोवेळी आवश्यक त्या सूचना देण्यात येतील. आनंददायी शिक्षणासाठी ही प्रणाली विद्यार्थ्यांना मदत करते.

लर्न लाईव्हसाठी विकसित केलेल्या अध्ययन साहित्याबरोबरच प्रत्येक अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र व्हिडिओ लेक्चर्स तयार करण्यात येत असून ती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जातील.

बी.बी.ए. (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट) शिक्षणक्रमाला प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला ऑनलाईन अभ्यास करण्यासाठी ERA या ऑनलाईन प्रणालीमध्ये लॉगइन देण्यात येईल. विद्यार्थ्यांनी स्वत:च्या स्मार्ट फोनद्वारे अथवा लॅपटॉपद्वारे ERA या ऑनलाईन प्रणालीद्वारे दररोज अध्ययन करणे अपेक्षित आहे.

## 10. मूल्यमापन

बीबीए शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमांचे मूल्यमापनासाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन तसेच सत्राच्या शेवटी होणारे मूल्यमापन या दोन्हीद्वारे होईल.

प्रत्येक सत्रात असणाऱ्या ज्ञान व कौशल्याचे कामात उपयोजन (Application of Knowledge and Skills in Work) करण्यासंदर्भात असलेल्या दोन श्रेयांकाच्या लघुप्रकल्प अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याला कार्यपुस्तिकेमध्ये तो करत असलेल्या कामांमध्ये इतर अभ्यासक्रमांमधून प्राप्त केलेल्या ज्ञानाचे तसेच कौशल्यांचे उपयोजन कसे करत आहे, त्यात त्याला आलेले अनुभव, मार्गदर्शकांशी झालेल्या चर्चा, त्यांनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे केलेल्या कृती, त्याचे परिणाम आदी नोंदी ठेवायच्या असून या सगळ्याच्या आधारे मार्गदर्शक विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमामपन करेल आणि त्याआधारे श्रेणी देईल या श्रेणी गुणपत्रिकेत नोंदविल्या जातील. मात्र या अभ्यासक्रमाचा समावेश शिक्षणक्रमाची श्रेणी काढण्यासाठी केला जाणार नाही. ज्ञान व कौशल्याचे कामात उपयोजन (Application of Knowledge and Skills in Work) या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर सर्व अभ्यासक्रमांचे मूल्यमापन प्रत्येकी 100 गुणांसाठी होईल. यात दोन घटकांचा समावेश असेल

- **अंतर्गत परीक्षा:** ई लर्निंगमध्ये समाविष्ट विविध कृती, प्रश्नमंजूषा, चाचण्या, कार्यपुस्तिका इत्यादीद्वारे विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (कंटिन्युअस कॉम्प्रिहेन्सिव्ह इव्हॅल्यूएशन) करण्यात येईल. हे मूल्यमापन 30 गुणांसाठी होईल.
- **अंतिम परीक्षा:** सत्राच्या शेवटी होणाऱ्या 70 गुणांच्या लेखी परीक्षेद्वारे हे मूल्यमापन होईल.

**उत्तीर्णतेचे निकष**

बी.बी.ए. (बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट) हा शिक्षणक्रम यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी ज्ञान व कौशल्याचे कामात उपयोजन (Application of Knowledge and Skills in Work) करण्यासंदर्भात असलेल्या दोन श्रेयांकाच्या लघुप्रकल्प अभ्यासक्रमांव्यतिरिक्त इतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्याला उत्तीर्ण होणे आवश्यक असेल. यासाठी अंतिम परीक्षेत

किमान 40% गुण (70 पैकी किमान 28 गुण) आणि अंतर्गत आणि अंतिम परीक्षेत एकत्रीतपणे 100 पैकी किमान 40 गुण विद्यार्थ्याला मिळवावे लागतील. एखाद्या अभ्यासक्रमात अनुत्तीर्ण झाल्यास विद्यार्थ्याला केवळ अंतिम परीक्षा परत देता येईल. अंतर्गत गुणांसाठी परत परीक्षा घेतली जाणार नाही.

**श्रेणी**

परीक्षेत मिळालेले गुण विद्यापीठाने मान्य केलेल्या नियमांप्रमाणे श्रेणीत रूपांतरीत केले जातील. श्रेणी आणि त्याचे श्रेणी अंक पुढील तक्त्यात दिले आहेत

| श्रेणी | श्रेणी अंक |
|---|---|
| O (Outstanding) | 10 |
| A+(Excellent) | 9 |
| A(Very Good) | 8 |
| B+(Good) | 7 |
| B(Above Average) | 6 |
| C(Average) | 5 |
| P (Pass) | 4 |
| F(Fail) | 0 |
| Ab (Absent) | 0 |

## 11. प्रवेश प्रक्रिया – प्रवेश कसा घ्याल

अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया ybba.mkcl.org या संकेतस्थळावरून महाराष्ट्र ज्ञान महामंडळातर्फे कार्यान्वित करण्यात येईल. प्रवेश घेण्यास इच्छुक विद्यार्थ्यांना या संकेतस्थळावरील अर्ज भरून द्यावा लागणार आहे. (परिशिष्ट आ)

- संकेतस्थळावरील विहित नमून्यातील माहिती भरणे
- अर्जासोबत विविध सेवा क्षेत्र / व्यवसाय / उद्योग / स्वयं रोजगार / संस्था इत्यादी मार्फत पदवी शिक्षणक्रमाच्या तीन वर्षांमध्ये सातत्याने उपजीविका करणार असल्याचे तपशीलासह प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. (**परिशिष्ट इ**) यामधील माहितीच्या आधारे विद्यार्थ्यांना समुचित मार्गदर्शक मिळतील.
- विहित नमून्यातील उर्वरित माहिती भरणे
- शिक्षणक्रमाचे शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणे
- प्रवेशासाठीची पात्रता अभ्यासकेंद्र तपासेल व पात्र विद्यार्थ्यांना मान्यता देईल.
- पात्र विद्यार्थ्यांना कायम नोंदणी क्रमांक दिला जाईल.
- अपात्र विद्यार्थ्यांना शुल्क परत मिळणार नाही.

## 12. पुनर्नोंदणी

या शिक्षणक्रमासाठी पुनर्नोंदणीची सोय नसेल. विहित कालावधीत शिक्षणक्रम पूर्ण न करू शकणाऱ्या विद्यार्थ्याला पुन्हा नव्याने शिक्षणक्रमास प्रवेश घ्यावा लागेल.

## 13. संपर्कासाठी तपशील

| महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ |
|---|---|
| जनरल मॅनेजर, MKCL Finishing Schools<br>दूरध्वनी: (020) 40114500 / +91-8956537496<br>ईमेल:ybba@mkcl.org<br>संकेतस्थळ: www.mkcl.org<br>ybba.mkcl.org | संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा<br>दूरध्वनी: (0253) 2230717<br>ईमेल: scmcs@ycmou.digitaluniversity.ac<br>संकेतस्थळ: http://ycmou.digitaluniversity.ac<br>ycmou.ac.in |

## 14. विभागीय केंद्रे

| अ. क्र. | विभागीय केंद्र | जिल्हे | दूरध्वनी क्रमांक | विभागीय संचालकांचे ईमेल |
|---|---|---|---|---|
| 1) | अमरावती विभागीय केंद्र<br>व्ही.एम.व्ही ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही., अमरावती 444 604 | अकोला<br>अमरावती<br>बुलढाणा<br>यवतमाळ<br>वाशीम | (0721) 2531445 | rd_amravati@ycmou.digitaluniversity.ac |
| 2) | औरंगाबाद विभागीय केंद्र<br>सर्व्हे क्रं. 41, नंदनवन कॉलनी, छावणी, औरंगाबाद 431 002 | औरंगाबाद<br>बीड<br>जालना<br>उस्मानाबाद | (0240) 2371066, 2371077 | rd_aurangabad@ycmou.digitaluniversity.ac |
| 3) | मुंबई विभागीय केंद्र<br>जगन्नाथ शंकरशेठ मराठी शाळा, दुसरा मजला, नाना चौक, ग्रँट रोड (प), मुंबई 400 007 | मुंबई<br>रायगड<br>ठाणे<br>पालघर | (022) 23874186, 23826135, 23874177 | rd_mumbai@ycmou.digitaluniversity.ac |
| 4) | नागपूर विभागीय केंद्र<br>सुभेदार हॉल, विद्यापीठ क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कॅम्पस, रविनगर चौक, नागपूर 440 001 | नागपूर<br>भंडारा<br>चंद्रपूर<br>गडचिरोली<br>वर्धा<br>गोंदिया | (0712) 2553724, 25 | rd_nagpur@ycmou.digitaluniversity.ac |
| 5) | नाशिक विभागीय केंद्र,<br>नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत, दुसरा मजला, नवीन पंडित कॉलनी, नाशिक 422 002 | अहमदनगर<br>धुळे<br>जळगाव<br>नाशिक<br>नंदूरबार | (0253) 2317063 | rd_nashik@ycmou.digitaluniversity.ac |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6) | पुणे विभागीय केंद्र,<br>शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशाला,<br>महापालिका शाळा क्र. 5 (मुलींची),<br>654, सदाशिव पेठ हौदासमोर,<br>कुमठेकर मार्ग, पुणे 411 030 | पुणे<br>सातारा<br>सोलापूर | (020) 24457914 | rd_pune@ycmou.digitaluniversity.ac |
| 7) | कोल्हापूर विभागीय केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ परिसर, पोस्ट ऑफीसजवळ, विद्यानगर 416 004 | कोल्हापूर<br>सांगली<br>रत्नागिरी<br>सिंधुदुर्ग | (0231) 2607022 | rd_kolhapur@ycmou.digitaluniversity.ac |
| 8) | नांदेड विभागीय केंद्र,<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ क्रीडा इमारत,<br>नांदेड 421 606 | लातूर<br>नांदेड<br>परभणी<br>हिंगोली | (02462) 229940, 283038 | rd_nanded@ycmou.digitaluniversity.ac |

# परिशिष्ट अ

## Academic Bank of Credits-ID तयार करण्याबाबची सूचना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरम- 2020 नुसार विद्यार्थ्याने Academic Bank of Credits-ID तयार करणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांने प्राप्त केलेले प्रमाणपत्र, पदविका, पदवीची माहिती विद्यार्थ्याला Digi Locker (ABC-NAD) वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमासाठी क्रेडीट ट्रान्स्फर करता येणार नाही. विद्यार्थ्याला Academic Bank of Credits-ID ची नोंदणी http://www.abc.gov.in या पोर्टलवर करता येईल किंवा विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in या संकेतस्थळावर करता येईल. या संकेतस्थळावरील Student Zone मधील Academic Bank of Credits वर क्लिक केल्यानंतर Academic Bank of Credits-ID तयार करण्यासंबंधित माहिती व पीपीटी सादरीकरण विद्यार्थ्याला उपलब्ध करून दिले आहे.

# परिशिष्ट आ

# (नमुना अर्ज)

**१. वैयक्तिक माहिती:**

नाव (पहिले नाव, मधले नाव, आडनाव)
शाळा सोडल्याच्या दाखल्यानुसार नाव
वडिलांचे नाव
आईचे नाव
लिंग
जन्मतारिख
वैवाहिक स्थिती
मातृभाषा
जातवर्गीकरण
आधार क्रमांक
पॅन

**२. संपर्काची माहिती:**

मोबाईल नंबर
पर्यायी मोबाईल नंबर
इमेल आयडी
पर्यायी इमेल आयडी
संपर्कासाठी पत्ता (राज्य, जिल्हा, गाव, प्रदेश /क्षेत्र, पिन कोड यासह)
कायमचा पत्ता (राज्य, जिल्हा, गाव, प्रदेश /क्षेत्र, पिन कोड यासह)

**३. शैक्षणिक तपशील:**

शैक्षणिक पात्रता
विद्याशाखा
सूचना-

- तुम्हाला दहावीची गुणपत्रिका आणि प्रमाणपत्र, 10+2 किंवा समतुल्य गुणपत्रिका आणि प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे.
- File extension JPG, JPEG, PNG मध्येच असावेत
- गुणपत्रिका आणि प्रमाणपत्राच्या फाईलची size 10 KB पैक्षा जास्त आणि 200 KB पेक्षा कमी असावी.

**४. कार्य अनुभव आणि दस्तऐवज अपलोड:**

सूचना

- तुम्हाला अलिकडिल फोटो आणि सही अपलोड करणे आवश्यक आहे.
- फोटो आणि सहीची फाईल  एक्स्टेंन्शन JPG, JPEG, PNG मध्येच असावेत
- फोटो आणि सहीची फाईल च्या फाईलची size 10KB पैक्षा जास्त आणि 200 KB पेक्षा कमी असावी.

**५. उपजीविकेच्या कामाचा तपशील:**

सूचना-

- तुम्ही स्वत:च्या किंवा तुमच्या कुटुंबाच्या उपजीविकेसाठी कोणते काम करत आहात?
- सदर BBA (Business Process Management) हा शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी 3 वर्षे सातत्याने प्रत्यक्ष काम करून उपजीविका मिळवीत असणे आवश्यक आहे.
- या अभ्यासक्रमासाठी ही पूर्व अट आहे.
  तुमच्या उपजीविकेबद्दल थोडक्यात माहिती
  आठवड्यातील कामाचे दिवस
  कामाचे दररोजचे तास
  प्रतिज्ञापत्र
  तुम्ही ही उपजीविका का निवडली?

# परिशिष्ट इ

## Learner Declaration which has to be signed by the Learner at the time of Admission

**To:**
**Maharashtra Knowledge Corporation Limited, Pune**

I, Mr/Ms. ___________________________________________, Form. No: ________________, do hereby accept the Admission to the Programme: BBA(BPM), and undertake the following:

**A. <u>Personal information and payment of fees</u>**

1. I, hereby, declare that, the entries made by me in the Application Form are complete and true to the best of my knowledge and based on records.
2. I understand and accept that the programme fees paid by me is non-refundable and non-transferable to anyone else and non-transferable to next year under any circumstances.
3. I, hereby, undertake to present the original documents immediately upon demand by the concerned authorities.

**B. Work Lab**

4. I understand that by accepting the Admission to this three year degree programme being offered collaboratively by Yashwantrao Chavan Maharashtra Open University (*YCMOU*) and Maharashtra Knowledge Corporation Limited, I am getting associated with the Work Lab provided by the company/organization as per mentioned in the Admission Letter, as a Learner of this degree programme for three years only.

5. I understand and accept that it is necessary for me to complete three years of Work Lab allotted to me continuously in order to get the degree mentioned above. The Work Lab once allotted shall remain the same for all three years of the degree mentioned above.

6. I understand and accept that in case I leave the Work Lab before the stipulated period of three years, I shall cease to be the Learner of BBA (BPM)

7. I understand and accept that this is purely temporary Work Lab for three years under the programme mentioned above and does not guarantee any job at the company/organization mentioned in the Admission Letter, either during or after 3 years degree programme.

8. I understand and accept that it is not mandatory to company/organization mentioned in the Admission Letter, to offer a job to me after completing three years of Work Lab and I have no right whatsoever to claim any permanent employment or preference in selection during or after completion of the period of Work Lab.

9. I understand and accept that it is mandatory for me to join the Work Lab on stipulated date and time as would be mentioned in the Scholarship Letter or any other form of communication from the company/organization providing Work Lab, failing which my admission to the aforesaid degree programme shall get automatically cancelled and I alone shall be fully responsible for the same.

10. I understand and accept that I shall abide by all the applicable and admissible rules, regulations and policies for scholars stipulated by the company/organization offering Work Lab to me.

Place: _____________ Signature of the learner: _____________

Date: ______________ Name of the leraner: ________________

**C. Learning, Assessment**

11. I understand and accept that I will be regular in studying eLearning modules through the eLearning framework for which login shall be provided to me by MKCL, at mutually convenient timings agreed with the company/organization offering Work Lab. Further, I understand that it is mandatory for me to complete the eLearning modules, take interim performance tests, submit assignments, activities etc. by following the schedule published by MKCL from time to time on website. I also promise to be punctual and proactive in completing my learning and assessment activities and shall be solely responsible to follow the communication being published on the website by MKCL from time to time.

**D. Other**

12. I understand and accept that 100% completion of in eLearning sessions is compulsory and I commit myself to adhere to the same.

13. I understand and accept that I shall be entitled to holidays at the Work Lab as per the rules and regulations stipulated by the company/organization offering Work Lab which would be mentioned in the scholarship letter or any other form of communication to me. I understand that I will not have any right to claim for any kind of un-approved vacation other than that mentioned in the formal communication to me, which in case availed shall lead to action as per the norms of the company/organization offering Work Lab and it will be mandatory for me to abide by it.

14. I understand and accept that the terms and conditions in the scholarship letter or any other form of communication to me as a learner under the above mentioned degree programme are subject to change as per University norms from time to time and shall be mandatory and binding on me.

15. I, hereby declare that, I shall be solely responsible if I am found involved in any kind of undesirable / indisciplinary activities outside the Work Lab campus. I, further understand that, MKCL shall in no way provide any support to me and shall not be held responsible for my any such action.

16. I, understand and accept that, my admission may be cancelled, at any stage, if I am found ineligible and/or the information provided by me is found incorrect/ false.

17. I, hereby undertake to inform MKCL, about any changes in information submitted by me, in the Application Form and any other documents, including change in name, marital status, address, phone no. email id, from time to time.

18. I, hereby declare that, I have read the rules related to admission and that the information furnished by me is true and complete to the best of my knowledge. I am aware that my admission will be finalized by the University based on the through scrutiny and satisfying the eligibility criteria and all necessary supporting documents properly verified by MKCL . I further agree that the decision taken by the University and any change made in the rules regarding admission from time to time will be binding on me.

Place: _____________ Signature of the learner: _____________

Date: ______________ Name of the learner: ________________

# परिशिष्ट ई

**University Grants Commission**

**Distance Education Bureau**

**F.No. 1-2/2021(DEB-I)** **10th March, 2021**

**Programme Recognition Status**

**Based on Interface Expert Committee Meetings held in the first week of February 2021, list of Higher Educational Institutions with recognized programmes under Open and Distance mode for the Academic Session beginning January (February-March as revised) 2021 to 2024-2025 ( Upto January, 2025 Academic Session only) is enclosed herewith.**

**Information for the HEIs/stakeholders is as follows:**

1. *The programme recognition details have already been sent to respective HEIs through UGC-DEB web portal.*
2. *Recognized HEIs may start admission process in the programmes recognised as per this list, from academic session beginning January (February-March as revised), 2021.*
3. *The last date for completion of admission process to offer programmes in ODL mode for February-March, 2021, academic session for year 2020-21 is 30th April, 2021. Accordingly, HEIs shall upload the admission details on UGC DEB web portal by 15th May, 2021.*
4. *Higher Educational Institution shall not offer any Open and Distance Learning Programme and/or Online Programme and admit learners thereto unless it has been granted recognition by the Commission and admission shall not be made in anticipation of the recognition*

UNIVERSITY GRANTS COMMISSION

**Rajnish Jain**
(Secretary)

| S. No. | STATE | NAME/CATEGORY OF HEI | PERIOD OF RECOGNITION | NUMBER OF RECOGNISED PROGRAMMES | NAMES OF RECOGNISED PROGRAMME | LINKS FOR HEI'S APPLICATION & AFFIDAVIT |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **ALAY, WARDHA** *(Central University)* | MARCH AS REVISED)2021 TO 2024-2025 (UPTO JAN, 2025 ONLY) | | 4. MASTER OF SOCIAL WORK<br>5. MASTER OF JOURNALISM | |
| 10 | MAHARASTHRA | **YASHWANT RAO CHAVAN MAHARASHTRA OPEN UNIVERSITY, NASHIK** *(State Open University)* | ACADEMIC SESSION BEGINNING JANUARY (FEBRUARY-MARCH AS REVISED)2021 TO 2024-2025 (UPTO JAN, 2025 ONLY) | 12 | 1. BACHELOR OF BUSINESS ADMINISTRATION-BUSINESS PROCESS MANAGEMENT<br>2. MASTER OF ARTS(MARATHI)<br>3. MASTER OF ARTS (HINDI)<br>4. MASTER OF ARTS (PUBLIC ADMINISTRATION)<br>5. MASTER OF ARTS (ECONOMICS)<br>6. MASTER OF ARTS (JOURNALISM & MASS COMMUNICATION)<br>7. MASTER OF ARTS (URDU)<br>8. MASTER OF SCIENCE (ZOOLOGY)<br>9. MASTER OF SCIENCE(BOTANY)<br>10. MASTER OF SCIENCE (CHEMISTRY)<br>11. MASTER OF SCIENCE (PHYSICS)<br>12. MASTER OF SCIENCE (MATHEMATICS) | • APPLICATION<br>• AFFIDAVIT |

UNIVERSITY GRANTS COMMISSION

# परिशिष्ट उ

## मुक्त विद्यापीठाच्या पदव्यांना समकक्षता व शासन मान्यता

**१) अन्य विद्यापीठांच्या पदवीशी समकक्षता**

मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांच्या पत्र क्र. समक (उ. शि.)/१०९४/३२८६१/मवि-१, दि. ३० ऑक्टोबर १९९५ च्या पत्रान्वये 'केंद्रीय किंवा राज्य विधिमंडळाने अधिनियमाद्वारे भारतातील विद्यापीठाने दिलेली पदवी/पदविका आणि संसदेने अधिनियमाद्वारे इतर शैक्षणिक संस्था प्रस्तावित केलेल्या आहेत किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम (१९५६) मधील कलम क्र. ३ अन्वये मानीव विद्यापीठे घोषित केली आहेत अशांच्या बाबतीत पदवी किंवा पदविका मान्यता देण्याबाबतचे औपचारिक आदेश विद्यापीठाने काढण्याची आवश्यकता नाही'.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाने अधिनियमाद्वारे (कायदा क्र. २०/१९८९) स्थापन केलेले विद्यापीठ असून त्यास विद्यापीठ अनुदान आयोगाचीही मान्यता आहे. **त्यामुळे या विद्यापीठाची पदवी इतर विद्यापीठांच्या पदवीशी समकक्ष आहे.**

**२) विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता**

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी त्यांचे पत्र क्र. F/S-15/89 (CPP-I) दि. ८ डिसेंबर १९९२ नुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९५६ च्या कायद्यातील कलम १२-बी अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास मान्यता दिली आहे.

**३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता**

उपसचिव व परीक्षा नियंत्रक, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्या पत्र क्र. १४७७ (१७/१९९४/कक्ष) **दि. १७ फेब्रुवारी १९९४ च्या पत्रातील मान्यतेसंबंधीचा मजकूर - 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे संविधिमान्य (Statutory) असल्यामुळे आपल्या विद्यापीठाच्या पदवीधर विद्यार्थ्यांकडून आलेले अर्ज देखील इतर मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवीधर उमेदवारांकडून आलेल्या अर्जांप्रमाणेच आयोगाकडून विचारात घेतले जातील'**

## मुक्त विद्यापीठाच्या पदवी/पदविकांना महाराष्ट्र शासन मान्यता

विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेली विद्यापीठे

राज्य सेवेतील पदासांठी पदवी/पदविकास मान्यता

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

**शासन निर्णय** : क्रमांक आरजीडी-१३९४/प्र.क्र. २१/९४/१३,मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ८ मार्च १९९५

**वाचा** : (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरजीडी-१०६१/१८९६७/११४ - जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९

**शासन निर्णय** : महाराष्ट्र लोक सेवा आयोगाशी विचार विनिमय करून उपरोक्त दिनांक २१ ऑगस्ट १९६९ च्या आदेशाद्वारे असा निर्णय घेण्यात आला होता की, केंद्र अथवा राज्य विधिमंडळाच्या अधिनियमाद्वारे स्थापित झालेली विद्यापीठे, संसदेच्या अधिनियमाद्वारे स्थापन झालेल्या इतर शैक्षणिक संस्था, किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ च्या अंतर्गत भाग ३ अन्वये जाहीर झालेली मानवी विद्यापीठे यांनी प्रदान केलेल्या पदव्या / पदविका तसेच भारतीय वैद्यकीय मंडळ अधिनियम, १९५६ च्या परिशिष्टांमध्ये अंतर्भूत केलेल्या वैद्यकीय व संलग्न विषयामधील पदव्या यांना शासकीय महाविद्यालयातील अध्यापकीय पदे वगळता, **राज्यातील सेवा व पदांवरील भरतीसाठी आपोआप मान्यता प्राप्त झाली असल्याचे समजण्यात यावे.**

(२) सदर आदेशासोबत विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या वैधानिक विद्यापीठे व संस्थांची यादी जोडण्यात आली होती. आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठे व संस्था यांची अद्ययावत यादी आता या आदेशासोबत जोडण्यात आली आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरजीडी - १०६१/१८९६७/९१४/जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९ मध्ये नमूद केलेल्या आणि वर परिच्छद १ मध्ये उद्धृत केलेल्या हेतूसाठी सदर सर्व विद्यापीठे/संस्था यांनी प्रदान केलेल्या पदवी/पदविकांना आपोआप मान्यता देण्यात आल्याचे समजण्यात यावे.

महाराष्ट्रचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

दा. र. राणे

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) राज्यपालांचे सचिव
(२) मुख्य मंत्र्यांचे सचिव
(३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
(४) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
(५) महालेखापाल, महाराष्ट्र -२, मुंबई
(६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
(७) अभिदान व लेखा अधिकारी, मुंबई
(८) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई
(९) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
(१०) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
(११) सर्व मंत्रालयीन शिक्षण
(१२) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
(१३) अवर सचिव, भारत सरकार, शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली
(१४) निवड नस्ती

**वाचा : महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त शासन निर्णय क्रमांक आर.जी.डी. १३९४/प्र.क्र.२१/९४/१३ मंत्रालय, मुंबई. दिनांक ८ मार्च १९९५ च्या सोबत जोडलेल्या यादीमध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांची अनुक्रमांक १४६ वर नोंद करण्यात आलेली आहे.**